स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्य विद्याशाखांतर्गत तत्त्वज्ञान विषयातील पीएच.डी.(विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा संक्षिप्त संशोधन आराखडा

: संशोधनाचा विषय :

" भारतीय आस्तिक दर्शनातील ज्ञान संकल्पना - एक चिकित्सक अभ्यास "

: संशोधक :

रत्नाकर ज्ञानोबा केंद्रे

: मार्गदर्शक :

डॉ. माधव नरहरी कांबळे

तत्त्वज्ञान विभाग प्रमुख

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट जि. लातूर

सन

जानेवारी 2024

१. प्रस्तावना :

मनुष्य हा विचारशील प्राणी असून आपल्या सभोवतालचे जग जाणून घेण्याची स्वाभाविक इच्छा प्रत्येकाच्या मनात असते. हे जग कसे अस्तित्वात आले ? जगाची निर्मीती कोणी केली ? या जगात माणसाचे स्थान काय आहे ? असे विविध प्रश्न त्यांच्या मनात जिज्ञासेतून निर्माण झाले. या प्रश्नांची उत्तरे मानव आपापल्या मताप्रमाणे सोडविण्याचा प्रयत्न करु लागला. त्यातूनच तत्त्वज्ञानाचा उदय झाला. जिज्ञासेतून विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याच्या प्रयत्नातून विविध तात्त्विक सिध्दांताची निर्मिती झाली. पाश्चात्य तत्त्वचिंतकांनी मांडलेल्या सिध्दांतास पाश्चात्य तत्त्वज्ञान व भारतीय तत्त्वज्ञांनी मांडलेल्या सिध्दांताना भारतीय तत्त्वज्ञान असे संबोधण्यात आले.

पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा उदय हा ग्रीक वसाहतीत मायलेटस शहरात झाला. सृष्टीचा उदय व विकास जाणण्याची उत्कंठा मानवाला अधिक होती. थेलिसने सृष्टीचे आदिकारण व मुलतत्त्व पाणी हे मानले. ॲनॅक्झिमॅडरने विश्वाच्या बुडाशी शाश्वत, अनंत व गुणरहित जे तत्त्व मानले त्यास त्याने असीम असे म्हटले. त्यानंतर ॲनॅक्झिमेनिसने वायु हेच विश्वाचे आदिकारण मानले.

हेरॉक्लिटसने परिवर्तन हेच सत्य होय असे मानले व पार्मिनायडिसने सत्य हे परिवर्तनरहीत असे प्रतिपादन केले. त्यानंतर डेमॉक्रिटसने विश्वाचे आदिकारण अणू मानले. ग्रीक तत्त्वज्ञानात सोफिस्टाचीही भूमिका महत्त्वाची मानली जाते. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटलच्या काळापासून तत्त्वचिंतन अधिक तर्ककठोर बनले. या ग्रीक तत्त्वज्ञानास आधुनिक काळात परिपुर्णतेकडे घेऊन जाण्याचे कार्य बुध्दिवाद, अनुभववाद व समन्वयवादाने केले.

सर्वसाधारणपणे असे मानले जाते की, भारतीय तत्त्वज्ञानाची सुरुवात वेदांपासून झाली `. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे चार वेद आहेत. वेदाच्या नंतर अनेक उपनिषदे अस्तित्त्वात आली. त्यातील ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड, मांडूक्य, तैत्तरीय, छांदोग्य, ऐतरेय, बृहदारण्यक ही महत्त्वाची उपनिषदे आहेत. सृष्टीचे स्वरुप व अंतिम सत्ता यांच्या संबंधाचे विवेचन त्यात आढळते.

दृश्य जगाचे अवलोकन करुन त्याचे मुलद्रव्य काय यासबंधी प्राचीन भारतीय तत्त्वचिंतकांनी जे तर्काधिष्ठीत मत प्रतिपादन केले त्यातून तात्त्वीक विचारसरणीचा म्हणजेच भारतीय दर्शनांचा उगम झाला. भारतीय तत्त्वज्ञानासाठी दर्शन अशी संज्ञा आहे. त्याचा अर्थ पाहणे, जीवनदर्शन, जीवनाकडे बघण्याचा सम्यक असा दृष्टीकोन होय.

वेद प्रामाण्याच्या दृष्टीने दर्शनाचे प्रथम आस्तिक व नास्तिक असे दोन प्रकार पडतात. वेदांचे प्रामाण्य जे दर्शन स्वीकारतात ती आस्तिक दर्शने आणि जी नाकारतात ती नास्तिक दर्शने होत. मध्वाचार्यांच्या 'सर्वदर्शनसंग्रह' या प्रख्यात ग्रंथात वेगवेगळ्या सोळा दर्शनांचे विवेचन केलेले आहे, पण, महत्त्वाची नऊ दर्शने पुढीलप्रमाणे आहेत. चार्वाक, जैन, बौध्द, न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा (वेदान्त) ही ती नऊ दर्शने आहेत. या दर्शनापैकी चार्वाक, जैन, बौध्द ही वेदांचे प्रमाण न मानणारी आहेत म्हणून ही नास्तिक दर्शने आहेत तर, न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा (वेदान्त) ही वेदप्रामाण्यवादी असल्यामुळे प्रस्तुत गणनेप्रमाणे हे षड्दर्शन आस्तिक होत.

भारतीय ज्ञानमीमांसेत यथार्थ ज्ञानाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न केले आहेत. यथार्थ म्हणजे 'सत्य'. म्हणजेच सत्य ज्ञान प्राप्त करण्यासाठी दर्शनकार प्रयत्न करीत असतात. परंतु या ठिकाणी ज्या ज्ञानाचा उल्लेख केला आहे. त्याचा नेमका अर्थ काय? त्याचे स्वरूप काय ? हे या ठिकाणचे महत्त्वाचे प्रश्न आहेत. यासंदर्भात भारतीय दर्शनकारांनी मोठ्या प्रमाणात मते मांडली आहेत.

ज्ञानशास्त्र (Epistemology) तत्त्वज्ञानाची ही प्रमुख शाखा असून या शाखेस सत्ताशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. कारण सत्ताशास्त्रामध्ये ज्या अंतिम सत्याची चर्चा केली जाते. त्या अंतिम तत्त्वाचे ज्ञान होते का ? होते तर कसे होते ? जे अंतिम सत्य आहे तेच खरे अंतिम 'तत्त्व आहे का ? इत्यादी प्रश्नांच्या संदर्भात ज्ञानशास्त्र तर उपयुक्त आहेच शिवाय ज्ञान शास्त्रामध्ये ज्ञान म्हणजे काय ? ज्ञानाची उत्पत्ती कशी होते ? ज्ञानाचे स्वरूप काय? ज्ञान यथार्थ असते का अयथार्थ ?

ज्ञानाचे साधने किती व कोणती ? ज्ञान स्वतः प्रमाण आहे का नाही ? ज्ञानामध्ये दोष निर्माण होतो तो कशामुळे ? दोषरहित ज्ञानाची कसोटी कोणती ? इत्यादी प्रमुख प्रश्नांचा आग्रही विचार केला जातो.

सामान्यतः ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञानाच्या साधनांच्या संमिश्र रूपाला ज्ञान म्हटले जाते. म्हणजेच ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञानाच्या साधनांना वेगवेगळे करून चालणार नाही. कारण हे सर्व घटक एकमेकांवर अवलंबून असतात. यापैकी कोणत्याही एका घटकाच्या अभावात ज्ञानाची प्राप्ती होत नाही. ज्ञानाला इंग्रजीमध्ये Knowledge म्हणतात. Knowledge या शब्दासाठी असंःदिग्ध ज्ञान, ओळख, विद्वता, विशिष्ट विषयातील प्रावीण्य, अनुभवातून वस्तूला ओळखणे इ. अर्थपूर्ण शब्द वापरले जातात, परंतु Knowledge शब्द संकुचित वाटतो. कारण तो केवळ सत्याच्या संदर्भात वापरण्याचा प्रयत्न झाला आहे. तर ज्ञान या शब्दाचे स्वरूप व्यापक आहे. कारण ते केवळ सत्याच्याच संदर्भात नव्हे, तर असत्याच्या (यथार्थ-अयथार्थ) संदर्भातही वापरला जातो. शिवाय ज्ञान केवळ विषय प्रकाशित करीत असते. मग तो विषय यथार्थ किंवा अयथार्थ ही असू शकतो. यावरून 'ज्याने विषय प्रकाशित होतो ते ज्ञान होय' असे म्हटले जाते. परंतु एका अर्थाने 'जेथे चेतनेचा प्रकाश असते ते ज्ञान होय' असे म्हटले जाते.

'संशोधन विषय निवडीचे महत्त्व :-

भारतीय दर्शनांचा जर साकल्याने विचार केला तर पाश्चात्य तत्त्वचिंतकाप्रमाणे याही दर्शनकारांनी ज्ञान (knowledge) विषयी विचार केलेला दिसून येतो. अगदी वेदापासून ते विविध दर्शनांपर्यंत 'जगात सत् काय आहे?' हाच मूलभूत प्रश्न उत्पन्न झालेला दिसतो.

तत्त्वज्ञानाचा उगमच 'या विश्वाच्या मुळाशी कोणते तत्व आहे?' या प्रश्नांच्या चिंतनात दिसून येतो. सबंध विश्वाची निर्मिती कशी आणि कशातून झाली असेल हा तत्त्वज्ञानाचा आदि प्रश्न आहे. या प्रश्नांशी संबंधीत प्रश्न काळाच्या ओघात निर्माण होत गेले. जसे विश्वाच्या बुडाशी अंतिम तत्व एक आहे की अनेक आहेत, ते जड स्वरुपी आहेत की चेतन स्वरुपी आहे ? जर ते एक नसेल आणि परस्परभिन्न स्वरुपाचे असेल तर त्यात आंतरिक संबंध असतो काय ? विश्वाची रचना या अंतिम तत्त्वातून घडत असताना हे तत्व

स्वयंमपणे तशी रचना करीत होते की या तत्त्वाच्या मागे इतर कोणत्यातरी प्रकारची शक्ती होती? हे अंतिम तत्त्व ज्यास आपण विश्वाचे उपादान तसेच प्रथम 'द्रव्य' म्हणून ओळखतो त्याचे ज्ञान आपणास कसे होते ? हे आणि अशा अनेक प्रकारचे प्रश्न तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात वेगवेगळया तत्त्वज्ञांनी उपस्थित केले. परंतु या प्रश्नांच्या समाधानासाठी मांडण्यात आलेली मते व सिध्दांत परस्पर सुसंगत नव्हते.

भारतीय ज्ञानमीमांसेत यथार्थ ज्ञानाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न केले आहेत. यथार्थ म्हणजे 'सत्य'. म्हणजेच सत्य ज्ञान प्राप्त करण्यासाठी दर्शनकार प्रयत्न करीत असतात. परंतु या ठिकाणी ज्या ज्ञानाचा उल्लेख केला आहे. त्याचा नेमका अर्थ काय? त्याचे स्वरूप काय ? हे या ठिकाणचे महत्त्वाचे प्रश्न आहेत. यासंदर्भात भारतीय दर्शनकारांनी मोठ्या प्रमाणात मते मांडली आहेत.

भारतीय ज्ञानमीमांसेत यथार्थ ज्ञानाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न केले आहेत. यथार्थ म्हणजे 'सत्य'. म्हणजेच सत्य ज्ञान प्राप्त करण्यासाठी दर्शनकार प्रयत्न करीत असतात. परंतु या ठिकाणी ज्या ज्ञानाचा उल्लेख केला आहे. त्याचा नेमका अर्थ काय? त्याचे स्वरूप काय ? हे या ठिकाणचे महत्त्वाचे प्रश्न आहेत. यासंदर्भात भारतीय दर्शनकारांनी मोठ्या प्रमाणात मते मांडली आहेत. या प्रश्नांची अनेक दर्शनकारांनी विभिन्न उत्तरे दिली. विद्यार्थी दशेपासूनच या प्रश्नांच्या समाधानाविषयी माझ्या मनात उत्सुकता होती व ज्ञानविषयक उपरोक्त प्रश्न माझ्या समोरही उभे होते म्हणून मी ' भारतीय आस्तिक दर्शनातील ज्ञानमीमांसा हा विषय निवडला आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्टे :-

1) भारतीय अस्तिक दर्शनातील ज्ञान संकल्पनेचा चिकित्सक अभ्यास करणे.
2) ज्ञान संकल्पनेचा मूळ धागा कोठे निघतो आणि त्याची परीक्षण या संकल्पनेचा उद्भव होण्यासाठी.
3) अस्तिक दर्शनातील ज्ञानविषयक मतभिन्नतेची ओळख करून घेणे.
4) वेगवेगळ्या दर्शनातील बदलत गेलेल्या ज्ञान संकल्पनेचे स्वरूप जाणून घेणे.
5) ज्ञान या संदर्भात भिन्न भिन्न विचार विविध दर्शनाच्या माध्यमातून आले असले तरी त्यातील साम्य शोधणे.

संशोधन पद्धती :-

संशोधन कार्य करताना मी प्रामुख्याने विश्लेषणात्मक व चिंतनात्मक पद्धतीचा अवलंब करुन क्वचित प्रसंगी तुलनात्मक पद्धतीचाही अवलंब करणार आहे.

गृहीतकृत्य :-

भारतीय आस्तिक दर्शनातील ज्ञान संकल्पनेचा अभ्यास केल्यानंतर या दर्शनापैकी केवळ न्याय दर्शन आणि वेदांत दर्शन यांनी ज्ञानाच्या संदर्भात मांडलेली संकल्पना ही स्वीकारण्या योग्य असावी अशी माझी सिद्धांत कल्पना आहे.

प्रबंधाची व्याप्ती: -

प्रस्तुत संशोधन भारतीय आस्तिक दर्शनापुरतेच म्हणजेच सांख्य, योग, न्याय, वैशेषीक, मीमांसा, आणि वेदांत या दर्शनापुरतेच मर्यादित आहे. या दर्शनातील अतिभौतीकी (तत्त्वमीमांसीय) भूमिकांचा अंतर्भाव संशोधन व्यक्तीच्या कक्षेत करण्यात येईल. असे अध्ययन करताना भारतीय अवैदीक दर्शने आणि पाश्चात्य तत्त्वचिंतनातील काही मतांचा उल्लेख यथानूरूप करण्यात येईल.

संशोधन आराखडा:-

प्रकरण पहिले- ज्ञान संकल्पनेचे स्वरूप-

प्रस्तुत प्रकरणात ज्ञान संकल्पनेच्या मूलभूत स्वरूपाचे विवेचन केले आहे. त्या अनुषंगाने 'ज्ञान' संकल्पनेचा अर्थ ज्ञानासंबंधी विभिन्न दृष्टिकोनाची सविस्तर चर्चा मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. सत्ताशास्त्रामध्ये ज्या अंतिम सत्याची चर्चा केली जाते. त्या अंतिम तत्त्वाचे ज्ञान होते का ? होते तर कसे होते ? जे अंतिम सत्य आहे तेच खरे अंतिम 'तत्त्व आहे का ? इत्यादी प्रश्नांच्या संदर्भात ज्ञानशास्त्र तर उपयुक्त आहेच शिवाय ज्ञान शास्त्रामध्ये ज्ञान म्हणजे काय ? ज्ञानाची उत्पत्ती कशी होते ? ज्ञानाचे स्वरूप काय? ज्ञान यथार्थ असते का अयथार्थ ? ज्ञानाचे साधने किती व कोणती ? ज्ञान स्वतः प्रमाण आहे का नाही ? या बाबींचे विवेचन या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे- सांख्य - योग दर्शन

सांख्य दर्शनाने ज्ञानाला द्रव्य मानले आहे सांख्येनी प्रकृती आणि पुरुष हे दोन तत्व (द्रव्य) स्वीकारले संख्यांनी मन बुद्धी आणि अहंकार यासाठी प्रकृतीला कारण मानले आहे. पैकी बुद्धीचा धर्म म्हणून ते ज्ञानाकडे पाहतात. ज्ञानाचे प्रकार सांख्यांच्या मते नवीनता निश्चयात्मकता निश्चित करणारे ज्ञान

यथार्थ ज्ञान होय संख्यांनी यथार्थ ज्ञानाला बुद्धीचा विकार म्हटले आहे जो अविपरीत असंदिग्धाने नाविन्यपूर्ण विषयांना प्रकट करतो अर्थात यथार्थ ज्ञानामध्ये विरोध संदिग्धता आणि पूर्वग्रह दूषितपणा किंवा स्मृती असता कामा नये.

प्रमा,अप्रमा,ख्याती,प्रामाण्यवाद तसेच काही ज्ञानाचे प्रमाणे त्यांनी स्वीकारले आहेत. तसेच प्रमेयाच्या साधनाच्या रूपात प्रमाणाला स्वीकारले आहे त्यांनी प्रमेयाच्या सिद्ध करणाऱ्या घटकाला प्रमाण असे म्हटले आहे. सांख्य दर्शन ज्ञानाला क्रिया नव्हे तर सत्ता म्हणून स्वीकारते. सांख्यांनी प्रकृती आणि पुरुष ही दोन तत्त्व सत् स्वरूपात सांगितले असले. सांख्य दर्शनामध्ये शब्द प्रमाण हे स्वतंत्र प्रमाण म्हणून स्वीकारण्यात आले आहे. सांख्य दर्शनाप्रमाणे योग दर्शनाने देखील प्रत्यक्ष आणि अनुमानाप्रमाणे शब्द प्रमाणाला स्वतंत्र प्रमाण मानले आहे दोन्ही दर्शनाची ज्ञान संदर्भातला विचार जवळ-जवळ सारखाच असला तरी दोन्ही दर्शनाचा दृष्टिकोन स्पष्ट करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे- न्याय- वैशेषिक दर्शन.

भारतीय दर्शनातील न्याय दर्शन आस्तिक दर्शन म्हणून ओळखले जाते. आपणास या जगाचे प्रत्यक्ष भान होत असते ते 'भान' म्हणजेच 'ज्ञान' होय अशी या दर्शनाची भुमिका आहे. न्याय दर्शनाच्या मते, ज्याप्रमाणे दिव्याचा प्रकाश वस्तूंना उजेडत आणतो त्याप्रमाणे ज्ञान विषयांना प्रकाशात आणण्याचे कार्य करते. या दर्शनात ही ज्ञानाचे प्रमा, अप्रमा, ख्याती, प्रमाण्यवाद असे प्रमाणे सांगितली आहेत. प्रमा ज्ञान हे अबाधित तत्त्व आहे, सत्तेतेच्या कसोटीला उतरविणाऱ्या ज्ञानास प्रमा ज्ञान असे म्हटले जाते. तर ज्या ज्ञानावर दुसऱ्या ज्ञानाने बाधा निर्माण होते, किंवा दुसऱ्या ज्ञानानंतर पहिल्या ज्ञानाला बाधा निर्माण होते त्यास अप्रमा असे म्हणतात. पंचेज्ञानेंद्रिय व मन यांचा वस्तूंची थेट संपर्क येऊन इंद्रियांनाच्या संवेदना निर्माण होतात त्याला प्रत्यक्ष प्रमाण किंवा 'इंद्रियसंवेदन' असे म्हणतात.

अनुमान- एखाद्या ज्ञानानंतर होणारे दुसरे वेगळे ज्ञान किंवा, एका प्राप्त ज्ञानाकडून दुसऱ्या अप्राप्त ज्ञानाकडे अनुमानाच्या साहयाने जाता येते. उपमान- साधर्म्याच्या साहयाने होणाऱ्या ज्ञानास उपमान असे

म्हणतात. शब्द- विश्वसनीय व्यक्तीच्या शब्दातून प्रमेची प्राप्ती होते. ज्ञानी, जाणकार, विश्वसनीय, या व्यक्तींकडून आपल्याला प्रमा ज्ञानाची प्राप्ती होते. न्यायांनी प्रत्यक्ष ज्ञानाचे लौकिक प्रत्यक्ष आणि अलौकिक प्रत्यक्ष असे दोन प्रकार केलेले आहेत. तसेच अनुमानाचे स्वार्थानुमान आणि परार्थानुमान असे दोन प्रकार केलेले आहेत.

प्रकरण चौथे- मीमांसा - वेदांत दर्शन.

ज्ञानाच्या संदर्भात मीमांसा दर्शनात प्रभाकर आणि कुमारील यांच्यात मतभेद दिसून येतात. प्रभाकर यांनी ज्ञानाला आत्म्याचा आकस्मिक (अगंतुक) लक्षण मानले आहे. तर कुमारील या संप्रदायाच्या मते, ज्या ज्ञानात दृढता आणि अबाधित्व असते ते यथार्थ ज्ञान होय. प्रभाकर यांनी अनुभूतीला यथार्थ ज्ञान म्हटले आहे त्यांनी वापरलेला अनुभूती शब्द व्यापक स्वरूपाचा आहे.

प्रमा-वेदांती यांनी अबाधित्वला यथार्थ ज्ञानाचे प्रमुख लक्षण मानले आहे. वेदांत दर्शनकार धर्मराजध्वरिंद्र यांच्या मते, स्मृतीशिवाय नाविन्यपूर्ण आणि अबाधित विषयाचे ज्ञान म्हणजे 'यथार्थ' ज्ञान होय. अप्रमा- भारतीय ज्ञानशास्त्रामध्ये अयतार्थ असत्य ज्ञानाच्या संदर्भात अप्रमा हा शब्द वापरला जातो. अप्रमा हा प्रमेच्या विरोधात वापरला जाणारा शब्द आहे. ख्याती- ख्यातीवाद भारतीय दर्शनातील जवळजवळ सर्वच दर्शनकारांनी प्रमा (सम्यक ज्ञान) म्हणजेच वास्तव ज्ञानाबरोबरच भ्रम (मिथ्या) ज्ञान याचेही स्पष्टीकरण दिलेले आहे. भ्रम,भ्रांति किंवा मिथ्या ज्ञानाच्या विवेचनालाच ख्यातीवाद म्हणतात.

प्रकरण पाचवे- निष्कर्ष:-

प्रस्तुत प्रकरणात संपूर्ण अभ्यासाअंती अस्तित दर्शनाच्या ज्ञानमिमांसेसंदर्भात काही निष्कर्ष मांडले जाणार आहेत. तसेच या विषयाची वर्तमानकालीन प्रासंगिकता सांगण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

संदर्भ सूची :-

लेखकाचे नाव **संदर्भ ग्रंथ, प्रकाशन व आवृत्ती**

१) श्रीनिवास दीक्षित- - भारतीय तत्त्वज्ञान, फडके प्रकाशन कोल्हापूर.

२) पां.दा. चौधरी -भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास, श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर.

३) भा.ग. केतकर -भारतीय तत्त्वज्ञानाची रुपरेषा, पां.स. सावंत, पुणे-प्रथम आवृत्ती १९७३

४) द.वा. जोग -सर्व दर्शन संग्रह, मु.द. जोग, रण वास्तुभवानीप्रसाद डोंबीवली जाने २०१३.

५) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन -भारतीय दर्शन (खंड १,२) राजपाल ॲण्ड सन्स, दिल्ली -०६ मार्च १९६९

६) दे.द. वाडेकर -मराठी तत्त्वज्ञान महाकोश (खंड १,२,३)

७) यदुनाथ सिन्हा। -भारतीय दर्शन-मोतीलाल बनारसीदास पब्लीशर्स दिल्ली, आवृत्ती २००८

८) डॉ. महेंद्रकुमार मिश्रा -भारतीय दर्शन-अर्जुन पब्लीशींग हाऊस नई दिल्ली -प्र.आ.२००९

९) प्रा.डॉ.सुनील साळुंके - पाश्चात्य तत्त्वज्ञानातील द्रव्य संकल्पना, मैत्री प्रकाशन लातूर. जुन २०१२.

१०) गजानन नारायण जोशी - भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास

११) मध्वाचार्य -भारतीय दर्शन का इतिहास -सर्व दर्शन संग्रह

संशोधक :

रत्नाकर ज्ञानोबा केंद्रे
रा. महाळंग्रावाडी ता-चाकूर, जी.- लातूर
मो. नंबर : 8552801704
ई मेल : kendreratnakar1@gmail.com

मार्गदर्शक :

डॉ. माधव नरहरी कांबळे
संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट
मो. नंबर : 9765640125
ई मेल : madhav358.2012@rediffmail.com